नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 27 / 09 / 2023 (बुधवार) सकाळ

## दुचाकी वाहन चोरणारा जेरबंद
## स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण ची कारवाई

दिनांक १९/११/२०२१ रोजी फिर्यादी नामे श्रीराम महादेव केळवदे यांनी पोलीस स्टेशन रामटेक येथे तक्रार दाखल केली की, त्यांची काळया रंगाची बजाज डीस्कव्हर कंपनीची क्र. MH 40/ AD 5432 ही राखी तलाव रामटेक येथे उभी करून ठेवली असता चोरीस गेलेली आहे. अशा त्यांच्या तक्रारी वरून पोस्टे रामटेक येथे मोटरसायकल चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण हे करीत होते. स्थानिक गुन्हे शाखेचे पथकास मोटर सायकल चोरीच्या गुन्ह्यांचे अनुषंगाने गुप्त बातमीदारां कडून दोन संशयित इसमा बद्दल महिती प्राप्त झाली. त्यानुसार पथकाने सापळा रचून **१) विनोद आनंदराव उईके व वय २५ वर्ष रा वार्ड न ५ कान्द्री ता. मोहाडी जि. भंडारा २) विधी संघर्ष बालक** यांना ताब्यात घेऊन सखोल विचारपूस केली असता त्यांनी वरील गुन्हा केल्याचे सांगितले. त्यांचे ताब्यातून चोरी केलेली १) बजाज कंपनीची डिस्कवर मो.सा. क्र MH 40/ AD 5432 किंमती २५०००/— रु जप्त करून पोलीस स्टेशन रामटेक येथील अप. क्र. ४८९/२१ कलम ३७९ भा.द.वि. मोटर सायकल चोरीचा गुन्हा उघडकीस आलेला आहे. तसेच २) एक काळया रंगाची हिरो होंडा स्पेलडर मो. सा. क्र. MH 40 AH 5505 कि. २५,०००/—रू असा एकूण ५०,०००/— रु. चा मुद्देमाल जप्त करून नमूद आरोपी क्र. १ ला वैद्यकिय तपासणी करुन जप्त मुद्देमाल व कागदपत्रांसह पोलीस ठाणे रामटेक यांचे ताब्यात देण्यात आले आहे. तसेच विधी संघर्ष बालक याला त्याच्या पालकांच्या ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही ही पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से.), अपर पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण श्री. डॉ. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गून्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, सहा. पोलीस निरिक्षक राजीव कर्मलवार, पोलीस हवालदार रोशन काळे, पोलीस नायक विपीन गायधने, प्रमोद भोयर, नितेश पिपरोदे, शंकर मडावी, उमेश फुलबेल, चालक अमोल कुथे यांनी पार पाडली.




## विनयभंगाच्या गुन्हयातील आरोपीस दोषसिध्दी ०१ वर्ष कारावास व ४०००/—रू आर्थीक दडांची शिक्षा

दोषसिध्द **आरोपी नामे चेतन विश्वनाथ मुंडले, वय ३० वर्ष रा. चापेगडी ता. कुही** याच्या विरुध्द पोस्टे कुही येथील अपराध क्र. २५/२०१६ कलम ३५४, ३४१, ५०६ भादंवी प्रमाणे गुन्हा नोंद करून सदर गुन्हयाचा तपास पोलीस उपनिरीक्षक मुलगीर यांनी केला व गुन्हयाचे दोषारोपपत्र मा. प्रथमश्रेणी न्यायदंडाधिकारी कुही याच्या न्यायालयात न्यायप्रविष्ठ होते.

सदर गुन्हयातील पिडीत साक्षदार व पंचांचे बयान तसेच आरोपी विरूध्द उपलब्ध पुराव्याची पडताळणी करूण मा. न्यायालयाने सदर गुन्हयाचा अंतीम सुनवाई दरम्यान दिनांक २६/०९/२०२३ रोजी आरोपी विरूध्द दोषसिध्द झाल्याने आरोपीस ०१ वर्ष कारावास व ४०००/—रू. आर्थीक दंडाची शिक्षा सुनावली सदर केसमध्ये सरकारी वकील अँड विलास मिरचे यांनी शासनाची बाजु मांडली.

सदर गुन्हयात पोलीस मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से.) तसेच अपर पोलीस अधिक्षक डॉ. संदिप पखाले साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक महेश भोरटेकर पोस्टे कुही, कोर्ट पैरवी राहुल देवीकर, अमीत आजबले यांनी साक्षदारांना योग्यपणे साक्षसंबंधाने ब्रिफ करून आरोपी विरूध्द गुन्हा दोषसिध्द करण्यास महत्वाची भुमीका पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर